# कला व वाणिज्य

# महा. वडूज

घार्गे लतिका जयवंत

रोल नं – 934 T.Y. BCom

विषय – सहकार

मार्गदर्शक शिक्षक

खोत सर

Scanned with CamScanner

ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्या -ची भूमिका स्पष्ट करा.

प्रस्तावना -

भूमिका भारत व महाराष्ट्राच्या अर्थ-व्यवस्थेत सह. साखर कारखान्यांना विशेष महत्त्व आहे. भारतात कापड उद्योगानंतर साखर कार-खान्यांच्या कारखाने काम करित आहेत. देशाच्या व राज्याच्या ग्रामीण भागातील विकासाची केंद्रे म्हणून सह. साखर कारखान्यांकडे पाहिले जाते. ग्रामीण विकासाच्या कार्यात सह. साखर कारखाने पुढीलप्रमाणे भूमिका पार पडतात.

अ. आर्थिक विकासातील भूमिका / सहभाग :

1) ऊस लागवड व उत्पादन वाढ :

सह. साखर कारखान्यांचे कार्य नियमित व पुरेसा ऊस पुरवठ्यावर अवलंबून असल्याने साखर कारखान्यांना प्रथम ग्रामीण भागात ऊसाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढविणे व दर हेक्टरी ऊस उत्पादनात वाढ करण्यावर भर द्यावा लागतो. याचा लाभ साखर कारखाने आणि ऊसाची शास्त्रीय पद्धतीने लागवड करणे माती परिक्षण करणे बियाणांचा खतांचा पुरवठा करणे ऊस तोडणीचे वेळापत्रक ठरविणे इ. कार्य करत असतात.

2) औद्योगिक व व्यावसायिक उपक्रमांना उत्तेज

ग्रामीण भागात साखर

कारखान्यांच्या स्थापनेमुळे त्या भागातील औद्योगिक व व्यावसायिक उपक्रम स्थापन होण्यास उत्तेजन मिळाले आहे. विशेषत: कृषी विकासासाठी उपयुक्त क्षेत्र अवजारांची निर्मिती रसायन निर्मिती, खत निर्मिती, पशुखाद्य इ. व्यवसाय साखर कारखान्यांच्या जवळपास सुरु होतात.

3) **ऊस उत्पादन व विकासात सहभाग :**

नियमितपणे पुरेश्या प्रमाणात ऊसाचा पुरवठा व्हावा यासाठी साखर कारखान्यांना प्रयत्न करावे लागतात कारण, त्यावरच त्यांचे अस्तित्व अवलंबून असते. यासाठी सर्व साखर कारखान्यांची ऊस संशोधन संस्थांची स्थापना केली असून त्यामार्फत ऊस बियाणे तयार करणे खतांचा वापर पाणी व्यवस्थापन इ. बाबत प्रयोग केले जातात संशोधनात प्राप्त होणाऱ्या सुधारित बियांचा पुरवठा शेतकऱ्यांना केला जातो त्यामुळे ऊस उत्पादन वाढीस मदत होते.

4) **ग्रामीण र रस्त्ये बांधणी :**

साखर कारखान्याने ग्रामीण भागात रस्त्याचे जाळे तयार करणे शेतीसाठी मुख्य रस्त्याला जोडणारे रस्त्येबांधणी व त्याचे प्रत्येक वर्षी दुरुस्ती करणे साखर कारखान्यांना महत्वाचे कार्य करावे लागते. शेतीपासून कारखान्यापर्यंत ऊसाची वाहतूक करता येतो.

5) **काटकसर व बचतीची सवय जोपासणे :**

सह साखर कारखान्यामुळे

ग्रामीण भागामुळे ऊस उत्पादन व बिगर ऊस उत्पादन यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली तसेच ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकांच्या सह बँकांच्या सह बँकांच्या ग्रामीण विकास बँका व पतसंस्था त्याच्या ग्रामीण जनतेला काटकसर व स्वस्तीच्या सवयी लावण्यात पुरेशा यशस्वी झाल्या.

6) **रोजगारात वाढ :** साखर कारखाने व त्यांच्या इतर प्रकल्पाने अप्रत्यक्ष व मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने कारखान्याजवळ स्थापनारे अल्प उद्योग व सेवा तसेच बाजारपेठांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारात वाढ झाली.

ब. **सामाजिक विकासातील भूमिका / सहभाग**

1) **शैक्षणिक विकास :** बहुतेक साखर कारखान्याने आपल्याकडील उपलब्ध नफ्याच्या काही भाग शैक्षणिक कार्यासाठी उपलब्ध करून त्यातून प्राथमिक शिक्षणापासून पदवीपर्यंत शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था स्थापल्या तसेच महाराष्ट्रात काही साखर कारखान्यांनी इंजिनिअरिंग व मेडीकल कॉलेज स्थापन केल्या तसेच शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू केल्या.

2) **वैद्यकिय सुविधा :** महाराष्ट्रातील बहुतेक सर्व साख-

कारखान्यांनी प्राथमिक स्वास्थ्य केंद्र दवाखाने चालविले असून ग्रामीण जनतेला अवश्यक सुविधा अल्प खर्चात पुरविल्या जातात. काही साखर कारखान्यांनी स्वत: मोठी हॉस्पीटल उभारली आहेत

3) गृहनिर्माण :

साखर कारखान्यामध्ये काम करणारे कामगार व इतर सेवकांना कारखान्याद्वारे निवासाच्या सोयी पुरविल्या तसेच कारखान्यां-द्वारे २० कलमी आर्थिक कार्यक्रमा अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय लोकांना मोफत घरे पुरवली आहेत.

4) वीज व पाणी पुरवठा :

शेतीला नियमीत पाणी-पुरवठा करता यावा यासाठी कारखाने शेतकऱ्यांना लघु पाणी पुरवठा योजना चालू करण्यास आर्थिक मदत देतात. विहीर खोदणे, तसेच पाणी पुरवठ्या-च्या इतर सोयींसाठी कारखान्यांनी स्वत:ची यंत्र-सामग्री खरेदी केली आहेत. तसेच कारखान्या मार्फत वीजेची सोय उपलब्ध करुन दिली आहे.

5) सांस्कृतिक विकासास मदत :

महाराष्ट्रातील सह. साखर कारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये कार्यरत असणारे ग्रंथालय, नाटक, मंडळे, सांस्कृतिक व तरुण मंडळे यांना आर्थिक मदत देतात.

Scanned with CamScanner